# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२४

-----------------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०२ जुलै, २०२४ / आषाढ ११, १९४६ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) सहकार मंत्री**<br>**(२) महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री**<br>**(३) वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री**<br>**(४) आदिवासी विकास मंत्री**<br>**(५) कृषी मंत्री**<br>**(६) रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री**<br>**(७) मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री** | **} यांचे प्रभारी विभाग** |

-----------------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ४१**

-----------------------------------------------

### राज्यामध्ये वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळणेबाबत

**(१) * २२९०१ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.जयंत पाटील, श्री.एकनाथराव खडसे, श्री.निलय नाईक, श्रीमती उमा खापरे, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: विदर्भ, मराठवाडा, खानदेश व पश्चिम महाराष्ट्र या विभागांमध्ये तसेच पोलादपूर (जि.रायगड) व तेल्हारा, अकोट, बाळापूर, बार्शीटाकळी (जि.अकोला) तालुक्यांमध्ये माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान वादळी वाऱ्यासह पडलेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे गहू, हरभरा, तूर, कांदा, मका, ज्वारी, मूग, भुईमूग व पान पिंपरी इत्यादी रब्बी पिकांसह संत्रा, लिंबू, चिकू, आंबा, केळी, पपई, टरबूज, द्राक्ष इत्यादी फळबागांचे व पशुधनांचेही नुकसान झाल्याचे तसेच पातुर (जि.अकोला) तालुक्यासह ७४ गावांमधील ४ हजार ६० हेक्टरवरील पिकांचे व ५५ घरांचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने पंचनामे करुन शेतकऱ्यांना लवकरात लवकर नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) होय.

मात्र पोलादपूर तालुक्यात माहे एप्रिल, २०२४ मध्ये अवकाळी पाऊस व गारपीट झालेली नाही.

पातुर तालुक्यात वादळी वाऱ्यासह पडलेल्या अवकाळी पाऊस व गारपिटमुळे एकूण ६६ गावातील खातेदार संख्या १०४६८ चे बागायत पीक आणि फळ पिकांचे नुकसान झाले असल्याचे सर्व्हेक्षणावरुन निर्दशनास आले आहे. तसेच पातुर तालुक्यात एकूण १२६ घरांचे अंशतः नुकसान झाले असल्याने सदर घरांच्या नुकसानीचे मुल्यांकन करण्याकरीता बांधकाम विभाग (पंचायत विभाग) यांचेकडे पाठविण्यात आले आहे. मुल्यांकन अहवाल प्राप्त होताच नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(२) दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२४ च्या मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार सामान्यकृत वनस्पती निर्देशांक (NDVI) हा निकष वापरुन शेतीपिकांचे नुकसान निश्चित करावयाचे असल्याने त्याबाबतची तपासणी वसंतराव नाईक मराठवाडा, कृषी विद्यापीठ परभणी यांच्याकडून आज प्राप्त झालेली आहे. सुधारित अनुदान मागणीचा प्रस्ताव सर्व विभागीय आयुक्त यांचेकडून प्राप्त झाल्यावर निधी वितरणाची कार्यवाही तात्काळ करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे कासेगाव (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील नुकसानग्रस्त बागायतदार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणेबाबत

**(२) * २३७८६ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कासेगाव (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील कृषी रसायन कंपनीचे "की" (key) बुरशीनाशक वापरले असता औषधामुळे सदरहू परिसरातील ११ शेतकऱ्यांच्या २५ एकर बागेचे तसेच अक्षय धनाजी देशमुख यांच्या ८ एकर बागेचे १०० टक्के नुकसान झाल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीचे बुरशीनाशक औषध पुणे येथील शासकीय प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविले असता, त्यामध्ये 2,4-D आणि Glyphosate चा अंश आढळून आला असून, कृषी विभागाने नुकसानग्रस्त बागेचा पंचनामा करून १००% नुकसान झाले असल्याचा अहवाल सादर केला असूनही बाधित बागायतदारांना कंपनी किंवा शासनाकडून अद्याप कोणतीही मदत मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नुकसानग्रस्त बागायतदार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देऊन बोगस औषध पुरवठा करणाऱ्या कृषी रसायन कंपनीवर कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधी व बाधित बागायतदार शेतकऱ्यांनी शासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मौजे कासेगाव (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील नुकसानग्रस्त बागायतदार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देऊन बोगस औषध पुरवठा करणाऱ्या कृषी रसायन कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सदर बुरशीनाशकामध्ये पुणे येथील शासकीय प्रयोगशाळेत तपासणीअंती तणनाशकांचे अंश आढळले आहेत. त्यानुषंगाने तालुका तक्रार निवारण समितीने नुकसानग्रस्त बागेचा पंचनामा करुन २०% ते १००% पर्यंत नुकसान झाल्याचे निष्कर्ष नोंदविले आहेत. कंपनीकडून कोणतीही मदत मिळालेली नाही.

(३) हे खरे आहे.

(४) सदर Thiophanate Methyl ७०% WP (Key) बुरशीनाशकाच्या बॅच नं. P/KRE ००२६ नमुन्यामध्ये तणनाशकांचे अंश आढळून आल्याने कृषी रसायन कंपनीवर प्रथम वर्ग न्यायालय, पंढरपूर येथे न्यायालयीन दावा क्रमांक एससीसी १८६/२०२४ दाखल करण्यात आला आहे. Thiophanate Methyl ७०% WP (Key) हे उत्पादन कृषी रसायन कंपनीच्या विक्री परवान्यातून वगळण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील पशुवैद्यकीय केंद्रांमध्ये सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३) * २३७८९ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात अंदाजे १२ लाख ५० हजार पशुधन असून, सदरहु पशुधनांकरीता जिल्ह्यात पशुवैद्यकीय केंद्रांची संख्या कमी असल्याने तसेच सदर केंद्रांमध्ये सोयी-सुविधा उपलब्ध नसल्याने पशुधनांवर योग्य उपचार करता येत नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सोयी-सुविधांअभावी शेतकऱ्यांना पशुधनांवर उपचाराच्या घरगुती उपाययोजना कराव्या लागत असून, त्यामध्ये पशुधन दगावण्याचा धोका वाढला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील पशुवैद्यकीय चिकित्सालयामध्ये एक्सरे, सोनोग्राफी मशीन व शस्त्रक्रियेच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच जिल्ह्यातील ८३ पशुवैद्यकीय श्रेणी-२ केंद्रांचा दर्जा वाढवून सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) सोलापूर जिल्ह्यात २०९ पशुवैद्यकीय दवाखाने व ६ पशुचिकित्सा पथक कार्यरत आहेत. या पशुवैद्यकीय दवाखान्यांमार्फत औषधोपचार, शस्त्रक्रिया, विविध रोगप्रतिबंधक लसीकरण, कृत्रिम रेतन व इतर अनुषंगिक सेवा पशुपालकांकडील पशुधनास पुरविण्यात येत आहेत.

राज्यातील सर्व श्रेणी-२ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यांचे श्रेणी-१ मध्ये श्रेणीवाढ करण्याचा तसेच प्रत्येक तालूक्याच्या ठिकाणी अद्यावत पशुउपचाराच्या सोयीसह “तालूका पशुचिकित्सालय” स्थापन करण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## कोल्हापूर शहराच्या उपनगर परिसरातील घरांना मिळकत पत्रिका देण्याच्यादृष्टीने कार्यवाही करणेबाबत

**(४) * २३४०७ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहराच्या उपनगर परिसरातील आजूबाजूच्या गावांतील सुमारे ६०,००० घरांना अजूनही मिळकत पत्रिका मिळत नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावांतील घरांना मिळकत पत्रिका देण्यासाठी सर्व्हे होण्याची गरज असून त्यासाठी ११ कोटी २१ लाख रुपयांची गरज आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निर्णय घेऊन आणि निधी उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच ६०,००० घरांचे सर्वेक्षण करून या घरांना लवकरात लवकर मिळकत पत्रिका देण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) कोल्हापूर महानगरपालिका हद्दीतील ६ व हद्दीबाहेरील लगतच्या ग्रामपंचायत क्षेत्रातील ६ अशा एकूण १२ गावांचे नागरीकरण झालेले सुमारे ३०७६.६७ हे.आर. इतके क्षेत्र असून त्यामधील अंदाजे ६०,००० मिळकतीच्या नगर भूमापनासाठी एकूण १२ गावातील १६४८ सर्व्हे नंबर प्रस्तावित करणेत आलेले आहेत. सदर १२ गावांमध्ये नगर भूमापन करणेसाठीची महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम-१२२ ची अधिसुचना जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडून दिनांक १५/०२/२०२४ रोजी मंजूर करण्यात आली आहे. नगर भूमापनाचे काम आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने करण्यासाठी रुपये ११,२१,७३,७८३/- इतका खर्च अपेक्षीत असून काम पूर्ण होईपर्यंत त्यामध्ये २५ टक्के वाढ होण्याची शक्यता आहे.

कोल्हापूर महानगरपालिकेने दिनांक १/७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिका हद्दीतील ६ गावांच्या नगर भूमापनासाठीचा खर्च उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शविलेली आहे. तसेच उर्वरित ग्रामीण क्षेत्रातील सहाही गावांचा मूळ गावठाण सर्वे झालेला असून गावठाणाबाहेरील विस्तारीत क्षेत्रातील नगर भूमापनाचे काम स्वामित्व योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात हाती घेण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांना मनरेगातून संरक्षण भिंत बांधून देण्याबाबत

**(५) * २३०६३ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या २२४० शाळा असून त्यापैकी ९८० शाळांना संरक्षण भिंत नसून, शाळांच्या आवारातील भौतिक सोयी-सुविधांची सुरक्षितता राखण्यासाठी तसेच विद्यार्थी सुरक्षिततेसाठी शाळांना संरक्षण भिंत असणे महत्वाचे असल्याने जिल्ह्यातील ९८० शाळांपैकी जिल्हा परिषद प्रशासनाच्या सूचनेनुसार ६८९ शाळांनी संरक्षणभिंती बांधण्यासाठीचे प्रस्ताव माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान महात्मा गांधी रोजगार हमी योजना (मनरेगा) विभागाकडे सादर केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शाळांना संरक्षणभिंती बांधण्याकरिता मंजुरीसाठी सादर केलेल्या प्रस्तावास अद्याप मान्यता न दिल्याने संरक्षण भिंतीचे काम सुरु झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद प्रशासनाने शाळांच्या संरक्षण भिंतीसाठी दाखल केलेल्या प्रस्तावास मान्यता देवून मनरेगातून संरक्षण भिंती बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) आणि (३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राज्यातील सर्व शाळांमध्ये संरक्षण भिंतीची कामे घेण्याबाबत नियोजन विभागाच्या दिनांक २५/०७/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये धोरण विहित करण्यात आले आहे. त्यानुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात कांदा प्रक्रिया उद्योग मोठ्या संख्येने उभारण्याबाबत

**(६) * २३०८९ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादनात देशात आघाडीवर असूनही, राज्यात कांदा प्रक्रिया उद्योगांची संख्या अत्यंत नगण्य असून, महाराष्ट्राच्या तुलनेत इतर राज्यांमध्ये कांदा उत्पादन कमी असतानाही कांदा प्रक्रिया उद्योग मात्र मोठ्या प्रमाणात आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या दहा वर्षांमध्ये राज्यातील कांदा लागवडीचे क्षेत्र दुप्पट झाले असून त्या तुलनेत मागणीत घट झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी शासनाकडे वेळोवेळी केलेल्या मागणीनुसार कांदा प्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी प्रोत्साहन देण्याबाबत तसेच राज्यात कांदा प्रक्रिया उद्योग मोठ्या संख्येने उभारण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.

गेल्या दहा वर्षात लागवडीच्या क्षेत्रात वाढ झाली असून उत्पादनातही वाढ झाली आहे. तसेच, राज्याची कांदा निर्यात दुप्पट झाली आहे. सन २०२३-२४ मध्ये दुसऱ्या अंदाजानुसार राज्यात ६.६७ लाख हे. क्षेत्रावर कांदा पिकाची लागवड झाली आहे.

(३) कृषी विभागामार्फत प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासाठी प्रधानमंत्री सुक्ष्म उद्योग प्रक्रिया योजना व मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना, मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प इ. योजना राबविण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना पीक विमा कंपनीकडून नुकसान भरपाई मिळाली नसल्याबाबत

**(७) * २३४६७ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील सोयाबीन पिकाचे ऐन काढणीच्या वेळेस रोगाच्या प्रादुर्भावामुळे ८०% नुकसान होऊनही अद्याप शेतकऱ्यांना पीक विमा कंपनीकडून नुकसान भरपाई मिळाली नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पिकांचे ८०% नुकसान झाले असतानाही पीक विमा कंपनीने कागदोपत्री केवळ २९.५६ % नुकसान दाखविल्यामुळे केवळ ५ ते १० टक्के नुकसान भरपाई मिळाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा प्रशासनाने शेतकरी बांधवांना सोयाबीन पिकांची २५% नुकसान भरपाई माहे नोव्हेंबर, २०२४ पूर्वी व उर्वरित नुकसान भरपाई उत्पादनात किती घट झाली त्यानुसार देण्याचे निश्चित केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना हेक्टरी ४० हजार रुपये नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनूसार पीक विमा योजनेत मध्य हंगामातील प्रतिकूल परिस्थिती अंतर्गत नुकसान भरपाईस पात्र होण्यासाठी सरासरी उत्पादनाच्या किमान ५०% नुकसान असणे आवश्यक असते. त्यास अनुसरुन खरीप २०२३ मध्ये पीक विमा योजनेत मध्य हंगामातील प्रतिकूल परिस्थिती अंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातील सोयाबीन पिकाकरीता रुपये २५.४५ कोटी नुकसान भरपाई मंजूर झाली आहे. मंजूर नुकसान भरपाई पैकी रुपये २५.३१ कोटी नुकसान भरपाई वाटप करण्यात आली असून उर्वरीत नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे.
(३) हे खरे आहे.

योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मध्य हंगामातील प्रतिकूल परिस्थिती या जोखीम बाबीकरीता अपेक्षीत नुकसानीच्या २५ टक्के रक्कम अग्रिम म्हणून देण्यात येते आणि उर्वरित नुकसान भरपाई ही पीक कापणी प्रयोगानुसार आलेल्या उत्पादनाच्या आकडेवारी नुसार देय ठरते.

(४) पीक विमा योजनेंतर्गत नुकसान भरपाई ही नुकसानीच्या प्रमाणात व आलेल्या उत्पन्नाच्या प्रमाणात देय ठरते. चंद्रपूर जिल्ह्यातील पीक विमा योजनेंतर्गत दिनांक २८/०५/२०२४ अखेर एकूण रुपये ५५.८९ कोटी अंतरीम नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली असून यापैकी रुपये २५.३१ कोटी नुकसान भरपाई वाटप करण्यात आली आहे. उर्वरीत नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील पेण-खोपोली रस्ता रुंदीकरणामुळे बाधित झालेल्या कुटुंबियांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(८)** * **२३२३६ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील पेण-खोपोली रस्ता रुंदीकरणामुळे (राष्ट्रीय महामार्ग एनएच १६६ डी) कामार्ली व वाकरूळ फाटा (ता.पेण) येथील बाधित ६६ कुटुंबियांच्या घरांचे तसेच दुकानांचे पूर्णतः नुकसान होत असून, सदर नुकसान भरपाई मिळण्यासाठी शासनाकडे मागणी केल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, जिल्हाधिकारी, रायगड व संबंधित अधिकाऱ्यांसमवेत येथील लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ यांच्या दिनांक २ डिसेंबर, २०२२ रोजी झालेल्या बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदयांनी लक्ष घालून बाधितांच्या घरांचे व दुकानांचे फेरमुल्यांकन करण्याचे आदेश संबंधिताना दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित स्थानिक कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग (ता.पेण, जि.रायगड) यांनी फेरमुल्यांकन करून दिनांक २४ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यादरम्यान मुल्यांकन अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी बाधितांना फेरमुल्यांकनानुसार मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) ते (४) मौजे पेण-खोपोली राष्ट्रीय महामार्गाच्या रूंदीकरणात बाधित होणाऱ्या कुटुबांना मोबदला मिळणेबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०२/१२/२०२२ रोजी सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे बैठक पार पडली. सदर बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदयांनी पुनश्च: संयुक्त पाहणी व सर्वेक्षण करुन बाधित होणाऱ्या अतिक्रमण बांधकामाबाबतचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले, हे खरे आहे.

बैठकीतील निर्देशाप्रमाणे संयुक्त पाहणी व सर्वेक्षण करुन बाधित होणाऱ्या अतिक्रमण बांधकामाबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी, रायगड कार्यालयाकडून दिनांक २६/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभागास सादर करण्यात आला होता. सदरचा अहवाल सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक १६/०२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये मदत व पुनर्वसन विभागाकडे पुढील

कार्यवाहीसाठी पाठविला आहे. पेण ते खोपोली रस्ता रुंदीकरणांमध्ये अतिक्रमीत बांधकामामध्ये ग्रुप ग्रामपंचायत कामार्ली व वाकरूळ हद्दीतील कोणीही बेघर होत नसल्यामुळे पुनर्वसन विभागाकडून पुढील कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यास विरोध करणाऱ्या विमा कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत

**(९) * २३३७५ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवामानात होणारे तीव्र बदलांमुळे शेतमालाचे नुकसान टाळण्यासाठी राज्य शासनाने सुरू केलेल्या एक रुपया विमा योजनेचा शेतकऱ्यांना कोणताही फायदा होत नसून, पिकांचे नुकसान झाल्यास १००% नुकसान भरपाई देण्याच्या केंद्र शासनाच्या आदेशाचे पालन अनेक विमा कंपन्या करित नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणत्याही टप्प्यावर होणाऱ्या पिकांच्या १००% नुकसान भरपाईला अनेक विमा कंपन्या विरोध करित असून, केंद्र शासनाच्या निर्णयानंतर सन २०२३-२४ च्या खरीप हंगामापासून नुकसान भरपाई देण्याचे आदेश असताना एकाही शेतकऱ्याला नुकसान भरपाई मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नैसर्गिक आपत्तीने नुकसान झाल्यास शेतकऱ्यास १००% नुकसान भरपाई न देणाऱ्या कंपन्यांवर शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

खरीप २०२३ मध्ये विविध जोखीम बाबींकरीता दिनांक २४/०५/२०२४ अखेर एकूण ७५.८४ लाख शेतकऱ्यांना रुपये ३९४१.१९ कोटी अंतरीम नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली असून त्यापैकी ६३.६३ लाख शेतकऱ्यांना रुपये ३३२२.२७ कोटी नुकसान भरपाई वाटप करण्यात आली आहे. उर्वरीत नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यात आदिवासी आश्रमशाळामधील विद्यार्थ्यांना सेंट्रल किचन मार्फत पुरविले जाणारे अन्न निकृष्ट दर्जाचे असलेबाबत

**(१०) * २३२०५ श्री.आमश्या पाडवी : तारांकित प्रश्न क्रमांक २१६३१ ला दिनांक ११ डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यात आदिवासी आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना सेंट्रल किचन मार्फत पुरविले जाणारे अन्न हे निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत विद्यार्थी व पालकांकडून करण्यात आलेल्या तक्रारीसंदर्भात मा.लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांना दिनांक २२ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या पत्रान्वये अवगत केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २८ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या पत्रान्वये चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश मा.आयुक्त यांनी संबंधितांना देऊनही अद्याप कोणतीही चौकशी झाली नसल्याने, सदर कंत्राटदारास अभय देण्याच्या हेतूने स्थानिक पातळीवरून तसेच वरिष्ठ स्तरावरून कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थी, पालक व लोकप्रतिनिधी यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी पारदर्शक चौकशी करून कंत्राटदारांस अभय देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २२/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना तक्रार केली होती. त्यानुषंगाने दिनांक ३१/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रकल्प अधिकारी, नंदुरबार यांना तक्रारीच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्याबाबत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी निर्देश दिले होते. त्यानुसार प्रकल्प अधिकारी, नंदुरबार यांनी दिनांक १२/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना अहवाल सादर केलेला आहे. त्यानुसार प्रयोगशाळेच्या अहवालात अन्नधान्य, कडधान्य व मसाल्याचे पदार्थ हे खाण्यायोग्य असल्याचे कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) तालुक्यातील नदीपात्रांमधून वाळूचा अवैधरित्या उपसा होत असल्याबाबत

**(११) * २३६५९ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) तालुक्यात सन २०२१ मध्ये पुरस्थिती येऊन गेल्यानंतर सावित्री, गांधारी, काळूसह विविध ठिकाणांहून वाहणाऱ्या उपनदयांतून गाळ काढण्याच्या नावाखाली वाळू ठेकेदारांकडून सातत्याने मोठ्या प्रमाणात वाळूचा उपसा केला जात असल्याचे माहे मार्च, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाळूचा उपसा नियमबाह्य यांत्रिक साधनांनी करण्यास मनाई असतानाही उपरोक्त नदीपात्रांमधील वाळू उपलब्ध करण्याकरीता वाळू ठेकेदारांकडून पोकलेन, जेसीबी इत्यादी साधनांचा वापर केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्य:स्थितीत येथील खाजगी जागेमध्ये गाळ भराव स्वरूपात पडून असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने माहिती घेऊन महाड तालुक्यातील नदीपात्रांमधून अवैधरित्या मोठ्या प्रमाणात वाळूचा उपसा करणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) सन २०२१ मध्ये महाड, जि.रायगड मध्ये पुरस्थिती येऊन गेल्यानंतर सावित्री, गांधारी, काळूसह विविध ठिकाणांहून वाहणाऱ्या उपनद्यामधून सन २०२१ ते २०२३ दरम्यान नियमानुसार आपत्ती सौम्यीकरणांतर्गत गाळ निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली आहे. तद्नंतर उपविभागीय अधिकारी कार्यालय यांचेमार्फत कोणतेही गाळ निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली नाही.

महाड तालुक्यामध्ये कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड यांचेकडील दिनांक २२/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये स्थानिक ठेकेदार यांना सावित्री नदी पात्रातील मौजे दादली पूल ते कंबुर्ली (बेट क्र.४ व ५) येथील गाळाचे निष्कासनाचे काम यांत्रिक पध्दतीने, स्वखर्चाने करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदरचा गाळ काढण्याचे काम सुरु आहे. सदर गाळ निष्कासनाकरीता यांत्रिकी साधनांचा उपयोग करण्यात आला आहे.

महाड तालुक्यामध्ये सन २०२२-२०२३ मध्ये सावित्री व इतर उपनद्यांमधून एकूण ७१ ठिकाणांहून गाळ काढण्यात आलेला असून, शासकीय व खाजगी जागेमध्ये सदरचा गाळ साठवणूक करण्यात आलेला आहे.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील वनांवर आधारित पारंपारिक रोजगार निर्मितीबाबत

**(१२) * २३४१४ श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हा हा जंगलाचा जिल्हा म्हणून ओळखला जात असून, या जिल्ह्यात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या वन विभागाचा विस्तार व वन कायदा ग्रामीण भागातील मुख्य पारंपारिक रोजगार निर्मितीत अडथळा निर्माण होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यात शेती हाच मुख्य व्यवसाय असल्याने ग्रामीण भागातील संपूर्ण अर्थव्यवस्था पूर्णत: शेतीवर अवलंबून असून शेतीचा हंगाम संपल्यावर उन्हाळयाच्या दिवसात जंगलावर आधारित मोहफुले, तेंदुपत्ता गोळा करणे, बूरुड कामे राखीव वनामुळे नष्ट होऊ लागली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वन विभागाने पिढ्यां-पिढ्या कसत असलेल्या शेतीचे स्थायी पट्टे न देता ते भुईसपाट केल्यामुळे येथील शेतकरी व भूमिहीन मजूर बेरोजगार होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शेतकरी आणि भूमिहीन मजूरांच्या मागणीनुसार पूर्वीपासून कसण्यात येणारे वनपट्टे स्थायी देण्याबाबत व वनातील मोहफूल, तेंदूपत्ता, बुरुड कामे इ. रोजगार निर्मितीकरीता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे खरे नाही.

चंद्रपूर वनवृत्तातील तिनही वनविभागात एप्रिल, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यादरम्यान मुख्य पारंपारीक रोजगार निर्मितीत अडथळा होत असल्याची बाब निदर्शनास आली नाही.
(३) व (४) हे खरे नाही.

चंद्रपूर जिल्ह्यात वनहक्क कायद्यातील नियमानुसार जिल्हास्तरीय समितीने एकूण ३८२५ दावे मंजूर करण्यात आले असून त्याचे क्षेत्र एकूण ४८२२.५७० हे. इतके आहे. चंद्रपूर वनवृत्तात एकूण ६७ तेंदू घटक असून त्यापैकी ६३ तेंदू घटकांची ई-निविदेद्वारे विक्री करण्यात आलेली आहे. त्यापासून चंद्रपूर जिल्ह्यातील स्थानिक ग्रामस्थांना तेंदूपाने संकलनाद्वारे रोजगार उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर तेंदू घटकाद्वारे प्राप्त झालेल्या स्वामित्व शुल्काची रक्कम २५००० संकलनकर्ते कुटुंब प्रमुखांना बोनस म्हणून वाटप करण्यात आली आहे. तसेच चंद्रपूर वनवृत्तातील तिनही वनविभागात एकूण १६४४ नोंदणीकृत बूरड आहेत. त्यांना एकूण ६२ निस्तार डेपोवरुन बूरड कामगारांना बांबू उपलब्ध करुन देण्यात येतात.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बेटेगाव (जि.पालघर) येथील जमिनीसंदर्भात तहसिलदार व तत्कालीन प्रांताधिकारी यांनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(१३) * २३०१२ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बेटेगाव (जि.पालघर) गावातील गट नं. १२३ एकूण क्षेत्र ११.३३ हे.आर. ही जमीन मे.गोल्ड स्ट्रीट प्रा.लिमिटेड झोन यांच्या नावे असून सदरची जमीन मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वेसाठी संपादीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची जमीन शेतजमीन असताना तहसिलदार, पालघर व तत्कालिन प्रांताधिकारी यांच्या संगनमताने बेकायदेशीररित्या बिगरशेती जमीन करुन जमीन मालकाचा आर्थिक फायदा करुन देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तहसिलदार, पालघर यांच्या मनमानी कारभाराविरुध्द ग्रामस्थांनी तक्रार करुनसुध्दा त्यांच्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने तहसिलदार, पालघर व तत्कालिन प्रांताधिकारी यांनी केलेल्या गैरव्यहाराबाबत त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) मौजे-बेटेगाव (ता.जि.पालघर) येथील सर्व्हे नं.१२३ एकूण क्षेत्र ११/३३/०० हे आर. पैकी ५.३५७४ हे.आर. एवढे क्षेत्र भूसंपादित करण्यात आले आहे. सदर जमिनीचा शेती दराने अंतिम निवाडा घोषित केला आहे. सदरचा निवाडा मान्य नसल्याने जमीन मालकाचा अर्ज भूसंपादन अधिनियम, २०१३ च्या कलम ६४ अनुसार निबंधक, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे पाठविण्यात आला आहे. तुर्तास प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महानंद संस्थेचे व्यवस्थापन राष्ट्रीय दुग्धविकास महामंडळाकडे सोपविण्यात आल्याबाबत

**(१४) * २३३९५ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अरुण लाड, श्री.सचिन अहिर, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांची आघाडीची शिखर संस्था असलेल्या "महानंद" दुग्ध संस्थेच्या संचालक मंडळाने दिनांक २८ डिसेंबर, २०२३ रोजीच्या बैठकीत व्यवस्थापकीय संचालकाच्या ढिसाळ कारभारामुळे महानंदची वाताहत झाल्याने तसेच दिनांक १३ मार्च, २०२४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत "महानंद" दुग्ध संस्थेचे व्यवस्थापन गुजरातमध्ये मुख्यालय असलेल्या राष्ट्रीय दुग्धविकास महामंडळाकडे (एनडीडीबी) सोपविण्याचा ठराव संमत केला असून शासनाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय दुग्धविकास महामंडळांने यासंदर्भात शासनाशी कोणत्या स्वरुपाचा करारनामा केला आहे, तसेच केलेल्या करारनाम्यानुसार महामंडळाचे नियोजन व प्रयोजन काय आहे,
(३) असल्यास, "महानंद"व "राष्ट्रीय दुग्धविकास महामंडळ" यांच्यामध्ये झालेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कामगारांची देणी, सेवेतील समावेश इत्यादीबाबत सार्वत्रिक करण्याची मागणी राज्यातील किसान सभा व अन्य संस्थांनी शासनाकडे केली असल्याचे दिनांक २४ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन त्याअनुषंगाने शासनाने सदर प्रस्तावावर निर्णय न घेता महानंद दुग्ध संस्थेच्या कारभारामध्ये सुधारणा आणण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित, (महानंद) मुंबई या दुग्धक्षेत्रातील सहकारी शिखर संस्थेची खालावलेली आर्थिक स्थिती विचारात घेऊन, सदर संस्थेचे पुनरुज्जीवन राष्ट्रीय दुग्धविकास मंडळामार्फत करण्याचा ठराव दिनांक १६/०१/२०२४ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत पारीत करण्यात आला. यानुषंगाने महानंदचे पुनरूज्जीवन राष्ट्रीय पातळीवरील दुग्धक्षेत्रातील प्रख्यात संस्था राष्ट्रीय दुग्धविकास मंडळामार्फत करण्याचा निर्णय दिनांक १३/०३/२०२४ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. सदर निर्णयाच्या अनुषंगाने दिनांक १५/०३/२०२४ रोजी

शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून, महानंदचे व्यवस्थापन व प्रचालन राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ (NDDB) मार्फत करण्यास तसेच सन २०२४-२५ ते २०२८-२९ या ५ वर्षांसाठी महानंदवर प्रशासक म्हणून राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाची (NDDB) नेमणूक करण्यात आली आहे.

(२), (३), (४) व (५) महानंदच्या पुनरूज्जीवन योजनेतंर्गत शासन व राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ (NDDB) यांचेमध्ये दिनांक १५/०४/२०२४ रोजी द्विपक्षीय करारनामा करण्यात आला आहे. या करारनाम्यानुसार राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाने (NDDB) सन २०२४-२५ ते २०२८-२९ या ५ वर्षांसाठी प्रशासक म्हणून कामकाज पाहावयाचे असून महानंदला उर्जितावस्था प्राप्त करुन द्यावयाची आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित, (महानंद) मुंबई चे पुनरुज्जीवन करण्याकरीता राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाने (NDDB) शासनाकडे रुपये २५३.५७ कोटी इतक्या रकमेची मागणी केलेली असून शासनाने सदर रक्कम भागभांडवल स्वरूपात उपलब्ध करुन देण्यास शासन निर्णय दिनांक १५/०३/२०२४ अन्वये मान्यता दिलेली आहे.

-----------------

## राज्यातील विशेषत: पालघर, गडचिरोली व अहमदनगर जिल्ह्यातील मजूरांची रोजगार हमी योजनेंतर्गत कोट्यवधी रुपयांची मजूरी थकीत असल्याबाबत

**(१५) * २२९६५ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राज्यातील विशेषत: पालघर जिल्ह्यात ६० हजारांहून अधिक आदिवासी मजूरांचे ३५ कोटी रुपये, गडचिरोली जिल्ह्यात २ लाख २९ हजार १८० मजूरांचे ३२ कोटी ७ लक्ष ९८ हजार ९७६ रुपये व अहमदनगर जिल्ह्यातील मजूरांची कोट्यवधी रुपयांची मजूरी थकीत असल्याने त्यांचेवर उपासमारीची वेळ आल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच चौकशीच्या अनुषंगाने मजूरांची थकीत मजूरी अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पशुधनांमधील वंध्यत्वाचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना करणेबाबत

**(१६)** * **२३३५९ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य दूध उत्पादनात संपूर्ण देशात सहाव्या क्रमांकावर असून, सन २०१९ च्या २० व्या पशुगणनेनुसार राज्यातील १,९५,९५,९९५ गाई म्हशींपैकी ५५,२२,५२७ गायी आणि ३२,८१,६५७ म्हशी पैदास सक्षम असल्याची व माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान राज्यात पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात आलेल्या वंध्यत्व निवारण शिबिरांमध्ये राज्यातील एकूण प्रजननक्षम पशुधनाच्या जवळपास ३० टक्केपेक्षा जास्त पशुधन प्रजननासाठी सक्षम नसल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शेतकरी जोडधंदा म्हणून पशुपालन व दुग्धव्यवसाय करीत असल्यामुळे पशुधनांमधील वंध्यत्वाची वाढती टक्केवारी पाहता यावर त्वरित उपाययोजना न केल्यास शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर त्याचा विपरित परिणाम होणार असल्याने उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) सर्वसाधारणपणे दुधाळ पशुधनाच्या एकूण पशुधन संख्येपैकी ३० टक्के प्रजननक्षम गायी म्हशींमध्ये वंध्यत्वाच्या तात्कालीक समस्या दिसून येतात. सदर समस्यांचे निराकरण करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाकडून नियमितपणे वंध्यत्व तपासणी व उपचार करण्यात येतात.

वंध्यत्व निवारणाच्या दृष्टीने पशुपालकांमध्ये जनजागृती व्हावी. या उद्देशाने दिनांक २०/११/२०२३ ते दिनांक ३१/१२/२०२३ या कालावधीत राज्यात “वंध्यत्व निवारण अभियान” हा विशेष कार्यक्रम राबविण्यात आला होता. सदर कार्यक्रमादरम्यान एकूण ३९,०२९ शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरांमध्ये ५,३१,४३३ पशुधनाची तपासणी करण्यात येवून, एकूण ४,१८,९९३ पशुधनांवर उपचार करण्यात आले आहेत.

राज्यातील पशुधनाच्या प्रजनन क्षमतेत वाढ होवून पशुपालकांच्या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने राज्यातील ४,८५३ पशुवैद्यकीय संस्था तसेच, १५३ फिरत्या पशुवैद्यकीय पथकांमार्फत पशुवैद्यकीय उपचारांबरोबरच वंध्यत्व तपासणी व त्यावर उपचार नियमितपणे केले जातात. याशिवाय पशुधनाच्या प्रजननक्षमतेत वाढ होण्याच्या दृष्टीने पशुधनास द्यावयाचा चारा, पशुखाद्य, त्यांचे स्वास्थ्य नियंत्रण, व्यवस्थापन याबाबत पशुपालकांमध्ये जागृती करण्यात येते.

(३) वंध्यत्व निवारण तपासणी व उपचार ही नियमित चालणारी बाब असल्याने विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वरवाडा (ता.तलासरी, जि.पालघर) येथील शासकीय आश्रमशाळेतील मुख्याध्यापकाने विद्यार्थिनीसोबत गैरवर्तन केल्याबाबत

**(१७) * २३६३५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरवाडा (ता.तलासरी, जि.पालघर) येथील शासकीय आश्रमशाळेतील मुख्याध्यापकाने इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनीसोबत गैरवर्तन केल्याची तक्रार मुलींनी आणि त्यांच्या पालकांनी आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे केली असल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय आश्रमशाळेत विद्यार्थिनीसोबत होणाऱ्या गैरप्रकारांमुळे तेथे राहणाऱ्या मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्याअनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१), (२) व (३) शासकीय आश्रमशाळा वरवाडा, ता.तलासरी, जि.पालघर येथील मुख्याध्यापकांविरुध्द तक्रार प्राप्त झाली आहे. मात्र सदर तक्रार निनावी असल्याने विशाखा समितीस तक्रारदाराची चौकशी करता आली नाही. तक्रार ज्या विद्यार्थीनी संदर्भात आहे तीने अथवा तिच्या पालकांनी प्रकल्प कार्यालयाकडे कोणतीही लेखी अथवा तोंडी तक्रार केलेली नाही.

आदर्श आचारसंहिता सुरु असल्याने शासकीय आश्रमशाळा वरवाडा येथील मुख्याध्यापकांची अन्यत्र बदली करता आली नाही मात्र त्यांची पर्यायी व्यवस्था शासकीय आश्रमशाळा तवा, ता.डहाणू, जि.पालघर येथे करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटीव्ह बँक आर्थिकदृष्ट्या अडचणीत आल्याबाबत

**(१८) * २३५१८ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटीव्ह बँकेच्या सभासदांना कर्ज मिळत नसल्याने ही बँक डबघाईला आली असल्याचे तसेच सदर बँकेकडून चार महिने कर्ज वाटप बंद केले असल्याने या बँकेचा सीडी रेशो ९६.५ टक्क्यावर गेला असल्याने कर्ज आणि ठेवी याचा ताळमेळ बसत नसल्याचे माहे मार्च, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सभासदांना यामुळे कोणत्याही प्रकारचे मोठे कर्ज उपलब्ध होत नसल्याने त्यांच्या आर्थिक अडचणीत वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटीव्ह बँकेला आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अंतर्गत कार्यरत कर्मचारी हे स्टेट ट्रान्सपोर्ट को ऑप बँकेचे सभासद आहेत. दिनांक ०१/०३/२०२४ ते मे, २०२४ या कालावधीत बँकेच्या एकूण ७०२ सभासदांना रुपये १९१६.७९ लाख एवढ्या रकमेचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. दिनांक ३१/०३/२०२४ रोजी बँकेचा सीडी रेशो ९३ टक्के इतका आहे.
(३) बँकेचे कामकाज सहकार कायदा व बँकींग नियमन अधिनियम मधील तरतूदीनुसार होत आहे किंवा नाही याबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ८९ अ अंतर्गत तपासणी करण्यात आली आहे. तसेच बँकेच्या कामकाजात प्रभावी सुधारणा होणेसाठी बँक व्यवस्थापनास वसुली, सीएएसए ठेवी वाढ, इतर उत्पन्न वाढीबाबत उपाययोजना, कलम ९१, ११ सरफेशी कायद्यांतर्गत वसूली व अंमलबजावणीबाबत पाठपुरावा करण्यासाठी आणि बँकेची परिस्थिती सुधारण्यासाठी बँकेवर पालक अधिकारी म्हणून उपनिबंधक, (जी.एस.) सहकारी संस्था, वार्ड यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुक्ताईनगर व यावल (जि.जळगाव) तालुक्यात वादळी पावसामुळे हजारो हेक्टरवरील पिकांच्या नुकसानीची भरपाई मिळणेबाबत

**(१९) * २३७०४ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर व यावल (जि.जळगाव) तालुक्यात माहे एप्रिल, २०२४ मध्ये झालेल्या वादळी पावसामुळे हजारो हेक्टरवरील केळी, गहू, मका, कांदा इत्यादी पिकांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महसूल व कृषी प्रशासनाकडून नुकसानीचे पंचनामे करण्यात आले आहेत काय व त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर नुकसान भरपाई देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) होय.

जळगाव जिल्ह्यात माहे एप्रिल, २०२४ या कालावधीत अवकाळी पाऊस, गारपीट व वादळामुळे मुक्ताईनगर व यावल तालुक्यांसह एकूण ८ तालुक्यात एकूण ८४३६.५९ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे.
(२) जळगाव जिल्ह्यात माहे एप्रिल, २०२४ या कालावधीत अवकाळी पाऊस, गारपीट व वादळामुळे एकूण ८४३६.५९ हेक्टर क्षेत्राच्या शेतीपिकांचे नुकसान झाले आहे. नुकसानी पोटी देय अनुदान रुपये २३३७.७२ लक्ष इतक्या रकमेच्या निधीची मागणीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक कार्यालयाकडून प्राप्त झालेला आहे. दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२४ च्या मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार सामान्यकृत वनस्पती निर्देशांक (NDVI) हा निकष वापरुन शेतीपिकांचे नुकसान निश्चित करावयाचे

असल्याने त्याबाबतची तपासणी वसंतराव नाईक मराठवाडा, कृषी विद्यापीठ परभणी यांच्याकडून करण्यात येत आहे. तपासणी नंतर सुधारित अनुदान मागणीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर त्याबाबत उचित निर्णय घेण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कृषी विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२०) * २३८३८ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, प्रा.राम शिंदे, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेतील उत्तीर्ण झालेल्या शिफारसपात्र १२१ उमेदवारांना कृषी अधिकारी पदावर रुजू करून घेण्यास शासनाने नकार दिल्याने महाराष्ट्र कृषी सेवा श्रेणीतून होणारी सरळ भरती पुन्हा प्रलंबित राहिल्याचे माहे मार्च, २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषी विभागातील अनेक पदे रिक्त असल्याने सदरहू पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०२१ च्या मागणीपत्राच्या अनुषंगाने महाराष्ट्र कृषी सेवा संवर्गातील परीक्षेतील उत्तीर्ण उमेदवारांच्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे मार्फत प्राप्त झालेल्या शिफारशीनुसार, महाराष्ट्र कृषी सेवा, गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील १२१ सरळसेवा उमेदवारांच्या नियुक्तीचे आदेश दिनांक ०१/०३/२०२४ रोजी निर्गमित करण्यात आले होते.

तथापि, रिट याचिका क्र.७३६९/२०२३ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक २७/०९/२०२३ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशाचा अवमान होत असल्याची बाब निदर्शनास आल्यामुळे दिनांक ०१/०३/२०२४ रोजीचे आदेश दिनांक ०४/०३/२०२४ च्या आदेशान्वये रद्द करण्यात आले. सद्य:स्थितीत प्रकरण मा.उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.
(२) सन २०२४ साठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून महाराष्ट्र कृषी सेवा, गट-अ, महाराष्ट्र कृषी सेवा, गट-ब व महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गाकरीता मागविण्यात आलेल्या मागणीपत्रानुसार वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २५/०५/२०१७ नुसार गठीत उपसमितीसमोर, कृषी विभागातील २५८ रिक्त पदे १०० टक्के भरण्यासाठी प्रस्ताव मान्यतेकरीता सादर करण्यात आला आहे.

तसेच, दिनांक ११ ते १४ ऑगस्ट, २०२३ रोजी कृषी सेवकांच्या २१०९ पदांसाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार, परीक्षेचा निकाल दिनांक २७/०३/२०२४ रोजी कृषी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत संभागस्तरावर संबंधित उमेदवारांच्या कागदपत्र पडताळणीची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंबाडा (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथील खाजगी अनुदानित शाळेचे अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळणेबाबत

**(२१) * २३०४५ श्री.किरण सरनाईक, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भामध्ये दिनांक ७ एप्रिल ते १५ एप्रिल, २०२४ मध्ये झालेल्या वादळ, गारपिटीसह अवकाळी पाऊसामुळे ग्रामविकास हायस्कूल अंबाडा (ता.मोर्शी, जि.अमरावती) या खाजगी अनुदानित शाळेचे टीन पत्रे, वर्ग खोल्याच्या भिंती पडून मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त नुकसान झालेल्या शाळेचे सर्वेक्षण व पंचनामे अद्याप करण्यात आले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंबाडा (ता.मोर्शी) येथील शाळेच्या नुकसानीचा पंचनामा करुन नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) होय.

(२) नाही.

(३) पंचनाम्याच्या अनुषंगाने उपअभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग मोर्शी यांच्याकडे मुल्यांकन करण्याची कार्यवाही सुरु आहे. मुल्यांकन झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर उचित निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास विभागाकडून विद्यार्थ्यांकरीता स्टेशनरी किट खरेदीची निविदा प्रक्रिया उशिराने राबविण्यात येत असल्याबाबत

**(२२) * २३१६६ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागामार्फत सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी आदिवासी विद्यार्थ्यांना देण्यात येणारे स्टेशनरी किट माहे जून, २०२३ मध्ये देणे आवश्यक असताना अद्यापपर्यंत किट देण्यात आलेले नसल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विकास विभागाकडून माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये स्टेशनरी किट खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येत असून शैक्षणिक वर्ष १५ एप्रिल, २०२४ रोजी संपणार असल्याने, सदरची निविदा प्रक्रिया ही केवळ कंत्राटदारांसाठी राबविली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे नाही.

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना स्टेशनरी या बाबीसाठी थेट लाभ हस्तांतरणाद्वारे लाभ देण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आरे वसाहत (मुंबई) येथील संरक्षित झोपड्यांचे पुनर्वसन प्रलंबित असल्याबाबत

**(२३) * २३१४१ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरे वसाहत (मुंबई) येथील झोपड्यांचे सन २००८ मध्ये सर्वेक्षण करण्यात आले असून सन २०११ पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षित झोपड्या म्हणून घोषित करण्यात आले होते, परंतु या झोपड्यांमधील कुटुंबांचे पुनर्वसन अद्यापि झाले नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी झोपड्यांची संख्या ८ हजार इतकी होती, परंतु आता ती दुप्पट झाली असून आरे वसाहतीला वन क्षेत्र म्हणून घोषित केले असतानाही प्रत्यक्षात त्याचे संरक्षण होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरे वसाहतीमध्ये कोणतेही बांधकाम करता येत नसल्यामुळे तेथील संरक्षित झोपड्यांतील कुटुंबियांना शौचालयासह इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देता येत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आरे, मुंबई येथील वन क्षेत्राच्या संवर्धनाकरीता तसेच तेथील संरक्षित झोपड्यांचे पुनर्वसन करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) आरे दुग्ध वसाहतीमधील आदिवासी पाडे व झोपडीधारकांच्या पात्र अपात्रतेबाबत सर्वेक्षण कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नाही. शासन राजपत्र दिनांक १२/१०/२०२० अन्वये आरे दुग्धवसाहतीतील २८६.७३२ हेक्टर आर क्षेत्र राखीव वनक्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले असून सदर क्षेत्र संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांना हस्तांतरीत करण्यात आले आहे. सदर हस्तांतरीत केलेल्या क्षेत्रामधून आदिवासी पाडे, झोपडपट्टी, रस्ते, पायवाटा इत्यादी वगळण्यात आले आहेत.

(३), (४) व (५) पर्यावरण, जलवायू व हवामान बदल विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली, भारत सरकार यांनी दिनांक ०५/१२/२०१६ रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेनुसार आरे दुग्ध वसाहतीमधील संपूर्ण परिसर पर्यावरण संवेदनशील क्षेत्र (ESZ) म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. अधिसूचनेतील तरतूदीनुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, पर्यावरण संवेदनशील क्षेत्र सनियंत्रण समिती गठीत करण्यात आलेली आहे.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, पर्यावरण संवेदनशील क्षेत्र सनियंत्रण समितीने दिलेल्या मंजूरीनुसार आरे दुग्ध वसाहतीमधील आदिवासी पाडे व इतर युनिट मधील झोपडीधारकांना शौचालये, गटारे व लादीकरण, पायवाटा, समाजमंदिर शेड इत्यादी मूलभूत नागरी सुविधा पुरविल्या जातात.

-----------------

## मौजे भोसरी (ता.माढा, जि.सोलापूर) येथील जमीन खरेदी व्यवहारात फसवणूक केल्याप्रकरणी दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(२४) * २३५४१ श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भोसरी (ता.माढा, जि.सोलापूर) येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ३९/०४/५० अ हा प्लॉट बिनशेती (क्षेत्र २.७२.००) बाबत फसवणूक झाल्याने भूमापन क्रमांक व उपविभाग/३९/०४/गट मौजे भोसरी कुर्डूवाडी (ता.माढा, जि.सोलापूर) या जागेची नगररचना विभागाकडून मोजणी केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खरेदीदारांनी वारंवार मागणी करूनही मोजणी केली नसल्याने अनेक सामान्य खरेदीदारांसह कैलासकुमार मोटे यांचीही फसवणूक झाली असल्याने, तक्रार केल्याप्रकरणी मोटे व कुटुंबियांच्या जिवास धोका निर्माण होऊन त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल होत असल्याबाबतची बाब माहे मार्च, २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी केलेल्या चौकशीच्या अनुषंगाने जमीन खरेदी व्यवहारात फसवणूक केल्याप्रकरणी लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री महोदयांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने दोषीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, निलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.

मोजणीची प्रक्रिया नगररचना विभागाकडून करण्यात येत नसून भूमि अभिलेख विभागामार्फत करण्यात येते.

उप अधीक्षक, भूमि अभिलेख, माढा कार्यालयातील अभिलेखाची पडताळणी केली असता, सदर गटधारकाने भूमि अभिलेख कार्यालयाकडे मौजे भोसरे येथील गट नं. ३९/०४/५० अ व मौजे भोसरे, कुर्डूवाडी गट नं.३९/०४ च्या मोजणीकामी रितसर मोजणी अर्ज केलेला दिसून येत नाही. त्यामुळे गट नं. ३९/०४/५० अ व ३९/०४ ची मोजणी झालेली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, माढा विभाग, कुर्डुवाडी यांनी त्यांच्या आदेश क्र. जमाबंदी/कावि/८२१, दिनांक १५/०५/२०२४ अन्वये संबंधित फेरफार पुनर्विलोकनात घेणेबाबत तहसिलदार, माढा यांना आदेशित केले आहे. तसेच, संबंधित दोषी मंडळ अधिकारी व तलाठी यांचेविरूध्द

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतूदीनुसार विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर करणेबाबत उपविभागीय अधिकारी, माढा विभाग, कुर्डुवाडी यांना कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील कांदिवली येथे उद्यानासाठी राखीव असलेल्या भुखंडावर अनधिकृत बांधकाम उभारल्याबाबत

**(२५) * २३२१७ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कांदिवली येथे उद्यानासाठी राखीव ठेवलेल्या भुखंडावर उभारण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामांना मिळालेली स्थगिती उठविण्यासाठी राज्य शासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्याने मा.उच्च न्यायालयाने सार्वजनिक भुखंडांवरील होत असलेली अनधिकृत बांधकामे रोखण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्याचे निदेश मुख्य सचिव यांना दिले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अनधिकृत बांधकामांना मिळालेली स्थगिती उठविण्यासाठी व मा.उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार अशा सूचना राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्याबाबत मा.मुख्य सचिवांकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, तसेच सार्वजनिक भुखंडांवरील होत असलेली अतिक्रमणे रोखण्याकरीता संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल झालेल्या जनहित याचिका क्र.५४/ २०१७ मध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक १७/०४/२०२४ रोजी आदेश पारित केले आहेत. सदर आदेशानुसार मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना शासकीय जमिनीवरील अतिक्रमण निष्कासना-बाबत तसेच यापुढे नव्याने अतिक्रमण होऊ नये, याबाबत परिणामकारक उपाययोजना करण्याचे निर्देश दिनांक २५/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये दिलेले आहेत.

-----------------

## राज्यातील १६२ वाघांचा मृत्यू झाल्याबाबत

**(२६) * २३३८० डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गेल्या ७ वर्षात रानडुकरांसाठी लावण्यात आलेल्या विजांच्या तारांमध्ये अडकून १६२ वाघांचा दुर्दैवी मृत्यू झाला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनांबाबत दखल घेऊन वाघांचे मृत्यू रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) राज्यात सन २०१८ ते माहे मे, २०२४ अखेर या कालावधीत एकूण २२ वाघांचा विद्युत प्रवाहामुळे मृत्यू झाल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत. प्रस्तुत सर्व प्रकरणांमध्ये वनगुन्हे नोंदविण्यात आले असून त्यापैकी १७ प्रकरणांमध्ये आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील कायदेशीर कार्यवाही सुरु आहे.

(२) विद्युत प्रवाहामुळे वाघांचे मृत्यू रोखण्यासाठी क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

विद्युत प्रवाहामुळे वन्यप्राण्यांच्या शिकारीच्या घटना होऊ नये याकरीता समन्वय साधण्याच्या दृष्टीने विद्युत वितरण कंपनी व क्षेत्रिय वन अधिकारी/ कर्मचारी यांच्या संयुक्त सभा आयोजित करण्यात येतात. या अनुषंगाने क्षेत्रिय वन अधिकारी/ कर्मचाऱ्यांशी संपर्क साधून वीज खंडीत होण्याच्या घटनांच्या माहितीचे तात्काळ आदान-प्रदान करण्यासाठी वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांची भ्रमणध्वनी क्रमांक उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. तसेच राज्य विद्युत मंडळाचे कर्मचारी व वन विभागाचे कर्मचाऱ्यांमार्फत ११ KV विद्युतवाहीनीचे क्षेत्रात संयुक्त गस्त करण्यात येते.

शेतालगत विद्युत प्रवाह सोडल्यामुळे किंवा विद्युत प्रवाहाच्या सहाय्याने वन्य प्राण्यांची शिकार करणाऱ्यांवर वनविभाग व विद्युत विभागाचे कायद्यानुसार दोषींवर कठोर कारवाई करण्यात येते आणि याबाबत गावागावात सभा घेऊन लोकांमध्ये जनजागृती देखील करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील केळी पिकाच्या बागांचे अतिउष्णतेमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळणेबाबत

**(२७) * २३८०९ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केळी पिकाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते, केळी पिकाच्या बागांना अतिउष्णतेचा फटका मोठ्या प्रमाणात बसल्याने उत्पादनात ३० ते ३५ टक्के घट झाली असून अतिउष्णतेमुळे केळी पीक उन्मळून पडत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात किमान ४० हजार हेक्टरहून अधिक क्षेत्रातील केळी पीक होरपळून निघाले असल्याने शेतकऱ्यांचे हजारो कोटींचे नुकसान झाले असल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या अखेरीस वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केळी पिकासाठी शेतकरी एकरी एक लाख रुपयांपर्यंत खर्च करीत असताना, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन त्याअनुषंगाने केळी पिकांचे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करुन मदत किंवा नुकसान भरपाई जाहीर करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) पुनर्रचित हवामान आधारित फळ पिकविमा योजनेंतर्गत जास्त तापमानामुळे नुकसान झालेल्या पात्र विमाधारक शेतकऱ्यांना शासन निर्णयानुसार भरपाईची कार्यवाही भारतीय कृषीविमा कंपनी मार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोडोली (जि.कोल्हापूर) येथील गायरान जमिनीवरील घरकुलांना बजाविण्यात आलेल्या नोटीसांबाबत

**(२८) * २३७४७ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोडोली (जि.कोल्हापूर) येथील गायरान जमिनींवर १९८० च्या सुमारास शासनामार्फत गरीब व बेघर लोकांना इंदिरा घरकुल योजनेंतर्गत घरे बांधून देण्यात आली असून, सदर घरकुलांमध्ये मागील ४३ वर्षांपासून कायमस्वरुपी राहत असलेल्या लोकांना व मिळकतधारकांना अतिक्रमण हटविण्यासंदर्भात महसूल विभागाने नोटीसा बजाविल्या असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नोटीसांबाबत तेथील नागरिकांनी निषेध व्यक्त केला असून पुनर्वसन करण्याबाबतची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२३ च्या पावसाळी अधिवेशनात सदर प्रकरणी मा.महसूल मंत्री महोदयांनी बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोल्हापूर जिल्ह्यातील गायरान जमिनीवरील नागरिकांच्या हक्कांची घरे नियमित करण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील सुमोटो ०२/२०२२ मधील आदेशाच्या अनुषंगाने कोल्हापूर जिल्ह्यातील सरकारी गायरान जमिनीवर विनापरवाना व बेकायदेशीरपणे कृषक/अकृषक प्रयोजनकरीता केलेल्या अतिक्रमण धारकांना नोटीसी बजावण्यात आलेल्या आहेत. तथापि, इंदिरा घरकुल योजनेंतर्गत घरे असलेचे संबंधितांनी महसुली पुरावे सादर केलेले नाहीत.

(४) शासन निर्णय, ग्रामविकास विभाग दिनांक १६/०२/२०१८ व दिनांक २२/०८/२०२२ तसेच, शासन निर्णय, नगरविकास विभाग दिनांक १७/११/२०१८ मधील तरतुदीनुसार पात्र असलेली अथवा शासनाच्या यापूर्वीच्या इतर कोणत्याही धोरणांनुसार/ तरतुदीनुसार संरक्षित असलेली अतिक्रमणे कार्यवाहीतून वगळण्यात यावीत, अशी भूमिका मा.उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्राव्दारे मांडण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत जनहित याचिका ०२/२०२२ मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा शहराजवळील वैनगंगेच्या पात्रामधून अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२९) * २३४७१ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा शहरापासून काही अंतरावरील वैनगंगेच्या पात्रातील ब्राम्हणी, रोवा, बेटाळा इत्यादी घाटांमधून वाळूचा अवैधरित्या उपसा करून ट्रक भरून अन्य जिल्ह्यात वाहतूक केली जात असल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारा जिल्ह्यातील वाळूंच्या तस्करीमुळे शासनाचा कोट्यवधी रूपयांचा महसूल बुडत असताना सुध्दा महसूल विभागातील अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन भंडारा जिल्ह्यातील वाळूचा अवैधरित्या उपसा करुन वाळू तस्करी करणाऱ्यांना आळा घालण्याबाबत व त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) भंडारा जिल्ह्यातील मोहाडी, तुमसर व पवनी तालुक्यात अवैध रेती वाहतुकीवर प्रतिबंध करण्यासाठी नियुक्त पथकामार्फत कारवाई करण्यात आल्या आहेत, त्यामध्ये माहे मार्च-एप्रिल, २०२४ या कालावधीत मोहाडी व तुमसर तालुक्यातील एकूण ८६ अवैध रेती वाहतूक करणाऱ्या वाहनांवर रुपये ०१,८०,४४,६३८/- एवढ्या रकमेची दंडात्मक कारवाई करुन वसूल करण्यात आले आहेत.

तसेच माहे मार्च-एप्रिल, २०२४ या कालावधीत मोहाडी, तुमसर व पवनी तालुक्यात जप्त करण्यात आलेला एकूण १२,२९४ ब्रास रेती साठा नजिकच्या डेपो मध्ये स्थलांतरित करण्यात आला असून सदर जप्त रेतीसाठी महाखनिज प्रणालीव्दारे निर्धारित किमतीस विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील आदिवासी व धनगर वाड्या/ वस्त्यांमध्ये मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३०) * २३६६६ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यांमध्ये १ हजार ४४ आदिवासी व धनगर वाड्या/वस्त्या असून, सदर वाड्या व वस्त्यांमधील २ लाख ८० हजार ६१६ लोकसंख्येपैकी १५४१ कातकरी समाजातील लोकांना अद्याप कच्च्या घरांमध्ये वास्तव्य करावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर १ हजार ४४ आदिवासी वाड्यांपैकी १ हजार ३ वाड्यांचे सर्वेक्षण झाले असताना ४१ वाड्यांचे सर्वेक्षण अद्याप अपूर्ण आहे, तसेच उक्त आदिवासी व धनगर वाड्यांच्या वस्त्यांमध्ये रस्ते, शाळा, वीज पुरवठा, आरोग्य केंद्र, स्वच्छतागृहे तसेच महिलांसाठी शौचालय या मूलभूत सोयी-सुविधा नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रायगड जिल्ह्यातील आदिवासी व धनगर वाड्यांच्या वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) देशातील आदिम जमातींच्या सर्वांगिण विकासाकरीता मा.प्रधानमंत्री महोदय यांच्या हस्ते दिनांक १५ नोव्हेंबर, २०२३ रोजी प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM JANMAN) या योजनेचे कार्यान्वयन करण्यात आले आहे.

देशातील १८ राज्यातील २०० जिल्ह्यातील २२००० गावातील ७५ विविध आदिम जमातींच्या २८ लाख लोकसंख्येच्या विकासासाठी सदर योजना राबविण्यात येणार आहे. त्यासाठी रुपये २४ हजार कोटी इतक्या आर्थिक तरतुदीस केंद्र शासनाच्या मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली असून त्यापैकी रुपये १५३३६ कोटी इतका निधी केंद्र शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येणार असून उर्वरित निधी राज्य शासनाच्या संबंधित विभागाद्वारे उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

सदर योजनेशी संबंधित असलेल्या ९ विभागांद्वारे (ग्रामविकास विभाग, आरोग्य विभाग, शालेय शिक्षण विभाग, ऊर्जा विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, आदिवासी विकास विभाग, नवीकरणीय ऊर्जा विभाग, कौशल्य विकास विभाग, माहिती तंत्रज्ञान विभाग) आदिम जमाती समुदायाचे जीवनमान उंचावण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या ११ प्राधान्य क्षेत्रांचा (घरकुले, रस्ते, मोबाईल मेडिकल युनिट्स, वसतिगृहे, घरांना विद्युत पुरवठा, पिण्याचे पाणी, वनधन विकास केंद्र, बहूउद्देशिय केंद्र, बहूउद्देशिय केंद्रांना सोलर विद्युत पुरवठा, मोबाईल टॉवरची उभारणी, व्यवसाय प्रशिक्षण कौशल्य विकास) समावेश सदर योजनेत करण्यात आला असून त्यानुसार आदिम समाजाच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय ठेवण्यात आले आहे.

तसेच आदिम जमाती विकास कार्यक्रम या राज्य योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यामध्ये रुपये २१ कोटी इतका निधी कातकरी समाजातील लोकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी गेल्या दोन वर्षात वितरीत करण्यात आला आहे.

वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत ग्रामीण भागातील विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग यांच्या तांडे/ वाडी/ वस्त्यांना प्राथमिक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात. सदरहू योजनेंतर्गत सन २०१८-२०१९ ते २०२३-२४ या कालावधीत रायगड जिल्हास्तरीय समितीमार्फत शिफारस केलेल्या कामांपैकी ३० विकास कामांना शासनस्तरावरुन प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

तसेच, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेंतर्गत धनगर प्रवर्गातील १२ वैयक्तिक लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ देण्यात आला आहे.

रायगड जिल्ह्यातील धनगर वाड्या/ वस्त्यांना बृहत आराखड्यानुसार मूलभूत सुविधा देणेबाबत जिल्हास्तरीय समितीमार्फत वेळोवेळी आढावा घेवून कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, मुंबई अंतर्गत असलेल्या मुलींच्या वसतिगृहामध्ये सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३१) * २३२४१ श्री.आमश्या पाडवी, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, मुंबई अंतर्गत मुलींचे केवळ एकच शासकीय वसतिगृह असून, सदर वसतिगृह भाडेतत्त्वावर घेतलेल्या इमारतीत असून वसतिगृहामध्ये सोयी-सुविधांचा अभाव असल्याने येथे राहणाऱ्या मुलींनी विविध स्तरावर निवेदने देऊन देखील प्रकल्प कार्यालय, मुंबई अथवा वरिष्ठ कार्यालय यांचेकडून कोणतीही पाहणी करण्यात आली नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतिगृहातील मुलींनी सामाजिक संघटनांमार्फत जनजाती आयोग, दिल्ली यांच्याकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाने विभागाकडे खुलासा मागितला होता तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी देखील सदर वसतिगृहास भेट देऊन निवेदनाद्वारे वास्तव परिस्थिती अतिरिक्त मुख्य सचिव, आदिवासी विकास यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही त्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर वसतिगृहात सोयी-सुविधा उपलब्ध करून न देणाऱ्या प्रकल्प अधिकारी, मुंबई व तत्सम अधिकाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्या अतिरिक्त मुख्य सचिव, आदिवासी विकास यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) नाही हे खरे नाही.

सदर वसतिगृहामध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा, शौचालय व स्नानगृह (मानकाप्रमाणे) इत्यादी सोयी-सुविधा उपलब्ध आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जव्हार-मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील गावपाड्यांना जोडणारे रस्ते व पुलांसाठी निधी मंजूर करणेबाबत

**(३२) * २२९६६ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील जव्हार-मोखाडा तालुक्यातील गावपाड्यातील आदिवासी गर्भवती महिलेला प्रसुतीसाठी दवाखान्यात आणण्यासाठी डोली करून ७ ते ८ किलोमीटरची पायपीट करावी लागत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तालुक्यातील गावपाड्यांना जोडण्यात येणारे रस्ते व पुलासाठी मोखाड्याचा २६ कोटी रुपयांचा व जव्हारचा २१ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जव्हार-मोखाड्यातील गावपाड्यातील रस्ते व पूल जोडून आदिवासी बांधवांचे जीवन सुकर होणेसाठी सदर प्रस्तावांना मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे नाही.

तथापि, सन २०२३ मध्ये अशा प्रकारची घटना मर्कटवाडी, ता.मोखाडा येथे घडली होती. त्यानुषंगाने सदर रस्ता मंजूर करुन रस्त्याचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे.
(२) व (३) आदिवासी उपायोजनेतंर्गत राज्यस्तरावरुन माहे मार्च, २०२३ मध्ये जव्हार-मोखाडा तालुक्यातील ९६.९७ कोटी किंमतीच्या १४४ कामांना, जुलै, २०२३ मध्ये ९१.९१ कोटी किंमतीच्या १३८ कामांना तसेच, माहे डिसेंबर, २०२३ मध्ये २५३.५८ कोटी किंमतीच्या ७६३ कामांना मंजूरी देण्यात आली आहे. तसेच, माहे जुलै, २०२४ मध्ये होणाऱ्या अतिरिक्त अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये नवीन रस्ते व पुलांची कामे मंजूर करण्याची बाब विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोरेगांव (मुंबई) येथील देवीचा पाडा या आदिवासींच्या जमिनीवर फिल्मसिटीकडून अतिक्रमण करण्यात आल्याबाबत

**(३३) * २३६४९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोरेगांव (मुंबई) येथील देवीचा पाडा या आदिवासींच्या जमिनीवर फिल्मसिटीकडून अतिक्रमण करुन त्यांचे राहते घर पाडण्यात आले असून, त्यांच्या शेतजमिनीवरील पिकांचेही नुकसान करण्यात आल्याचे माहे मार्च, २०२४ च्या चौथ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी स्थानिक पोलिसांना गुन्हा नोंदविण्याची विनंती करुनही याबाबत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने देवीचा पाडा येथील आदिवासींची घरे व जमिनी परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२) दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव येथील सुमारे ५२१ एकर जमीन शासनाच्या मालकीची असून, सदर जमिनीवर चित्रपट सृष्टीच्या विकासाच्या दृष्टीने दादासाहेब फाळके चित्रनगरी येथे कामकाज सुरु आहे. महामंडळाची जागा गैरकृत्यासाठी वापरत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर सदरच्या जागेत उभे असलेले पत्र्याचे शेड पाडण्याचे काम हाती घेण्यात आले. परंतु, महामंडळाच्या कामकाजामध्ये महामंडळाचे कर्मचारी श्री.किसन भगत यांनी अडथळा निर्माण केल्यामुळे श्री.गोविंद कवळे, सुरक्षा रक्षक, महाराष्ट्र सुरक्षा दल यांनी आरे पोलीस स्टेशन येथे अदखलपात्र गुन्हा नोंदणी क्र.१०१/२०२३, दिनांक २५/०१/२०२३ नुसार गुन्हा दाखल केला. श्री.किसन भगत हे महामंडळाच्या सेवेत असून, महामंडळाच्या स्थावर मालमत्तेचे नुकसान करुन महामंडळाच्या सुरक्षेमध्ये अडथळा आणत असल्यामुळे व त्यांची वर्तणुक ही महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ मधील (एक), (तीन) चा भंग करणारी असल्याने श्री.किसन भगत, परिचर यांना महामंडळाच्या सेवेतून महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या भाग २ मधील ४ पोटनियम (१) अन्वये दिनांक ३१/०१/२०२३ अन्वये निलंबित करण्यात आलेले आहे आणि त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी सुरु आहे.

(३) व (४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## कोतुळ (ता.अकोले, जि.अहमदनगर) पंचक्रोशीतील डोंगर जाळण्याची परंपरा बंद करून वनसंपदेचे संवर्धन करण्याबाबत

**(३४) * २३५०० प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोतुळ (ता.अकोले, जि.अहमदनगर) पंचक्रोशीतील डोंगर जाळण्याची परंपरा असल्याने येथील वनसंपदा नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोतुळ पंचक्रोशीतील दरवर्षी डोंगर जाळण्याची प्रक्रिया बंद करून वनसंपदेचे संवर्धन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) अकोले प्रा. व राजूर भवका या दोन वनपरिक्षेत्रातंर्गत मौजे कोतूळ, ता.अकोले, जि.अहमदनगर या गावाच्या परिसराचा समावेश होतो. सदर गावाच्या परिसरामध्ये डोंगर जाळण्याची परंपरा असून याबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी चौकशी केली असता वनक्षेत्रातून वाडी वस्तीचे लोक प्रवास करताना व मधाची पोळ काढताना मानवी हस्तक्षेपामूळे तसेच वनक्षेत्राच्या शेजारी शेतकरी मालकी क्षेत्राचे बांध पेटवताना वाऱ्यामुळे वनक्षेत्रास आग लागल्याचे निदर्शनास येते.

कोतूळ, ता.अकोले, जि.अहमदनगर या गावाच्या परिसरात माहे एप्रिल, २०२४ व त्यादरम्यान एकूण ११ आग लागण्याच्या घटना घडलेल्या असून, याबाबत वनगुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर घटनेबाबत वनक्षेत्र स्तरावरुन चौकशी केली असता, चौकशीअंती आरोपी आढळून आले नाहीत. वनक्षेत्रात आगी लागू नये यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

१) वनविभागामार्फत आगी लागू नये म्हणून दरवर्षी डिसेंबर व जानेवारीमध्ये जाळरेषा घेण्यात येतात.

२) वनक्षेत्रासाठी फायर वॉचरची नेमणूक केली जाते.

३) वनकर्मचारी व अधिकारी व गावातील नागरिक शिक्षक, विद्यार्थी स्वयंसेवी संस्था यांच्याशी संपर्क साधून आगीच्या घटना कळविण्याबाबत व विझविण्याबाबत मदत घेतली जाते.

४) आग विझविण्यासाठी फायर ब्लोअर मशीनचा वापर केला जातो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोरेगाव, मुंबई उपनगर येथील आरे कॉलनीतील अनधिकृत बांधकाम प्रकरणी समितीने अहवाल सादर न केल्याबाबत

**(३५) * २३१७२ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव, मुंबई उपनगर येथील आरे कॉलनीत मोठ्या प्रमाणात झालेल्या अनधिकृत बांधकाम प्रकरणी चौकशी करण्यासाठी दिनांक ८ जानेवारी, २०२४ रोजी समितीची नियुक्ती करुन एक महिन्यात अहवाल सादर करण्याचे आदेश मा.पालकमंत्री, मुंबई उपनगर यांचेकडून देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी नियुक्ती केलेल्या समितीने एका महिन्याच्या आत अहवाल सादर केला आहे काय, असल्यास अहवालात सादर केलेल्या शिफारशींचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, गोरेगाव येथील आरे कॉलनीत अनधिकृत बांधकाम करणाऱ्या दोषींवर तसेच अनधिकृत बांधकामास जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३) व (४) होय. तथापि, सदर समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यातील शिफारशीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## वडगाव (ता.अलिबाग, जि.रायगड) गावाला भूस्खलनाचा धोका निर्माण झाल्याबाबत

**(३६) * २३५५७ श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) शहरालगत असलेले वडगाव हे गाव डोंगराच्या पायथ्याशी वसलेले असून, या गावाच्या बाजूला असलेला लाल मातीचा संपूर्ण डोंगरच फोडण्याचे काम सर्रासपणे सुरू असल्याने डोंगर खचून वडगावचे माळीण गावाप्रमाणे भूस्खलन होऊन जीवित व वित्तहानी होण्याचा धोका निर्माण झाल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी ग्रामस्थांनी तहसिल कार्यालय, रायगड येथे वारंवार निवेदन देऊनही याबाबत प्रशासनाने कोणतीच दखल घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वडगाव (जि.रायगड) गावाला भुस्खलनाचा असलेला धोका दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) मौजे वडगाव येथील ग्रामस्थांनी तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांना ग.नं.३५० मधील गावाच्या सोयी करीता वापरणेबाबत या विषयाच्या अनुषंगाने अर्ज दिलेला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीत मौजे वडगाव, ता.अलिबाग येथील ग.नं.३५० मिळकत महाराष्ट्र सरकार ग्रुप ग्रामपंचायत, वडगाव अशी गा.न.नं.७/१२ मध्ये नोंद असून सदर स्थळाची मंडळ अधिकारी व तलाठी, अलिबाग यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता सदर जागेमध्ये डोंगर फोडल्याचे काम कुठेही चालू असल्याचे दिसून आले नाही व डोंगर खचून जाऊन धोका निर्माण होण्याची परिस्थिती दिसून आलेली नाही.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गावांचे गावनकाशेच अस्तित्वात नसल्याने मच्छीमारांचे नुकसान झाल्याबाबत

**(३७) * २३२३२ श्री.प्रसाद लाड, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग किनारपट्टीवरील सात जिल्ह्यातील गावांचे मागील २५ वर्षांपासून गाव नकाशेच अस्तित्वात नसल्याने अनेक मच्छीमारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पारंपारिक मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांचे क्षेत्र संरक्षित ठेवण्यासाठी सन १९९१ साली सीआरझेडचा कायदा अंमलात आला असूनही मागील २५ वर्षांपासून राज्यातील या ७ जिल्ह्यातील कोस्टल झोन क्षेत्रात गाव नकाशेच अस्तित्वात नसल्याने सागरी क्षेत्रातील विविध किनाऱ्यांवरील राखीव जागा नष्ट झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नकाशाअभावी पर्यावरणाचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून याचा फायदा घेत हजारो हेक्टर जमिनी सीआरझेडचे उल्लंघन करून विविध प्रकल्प, कंपन्या व भांडवलदारांना दिल्या जाऊन कोट्यवधींचा नफा कमाविला जात असल्याचा आरोप महाराष्ट्र स्मॉल स्केल ट्रॅडिशनल फिश वर्कर संघटनेकडून करण्यात आल्याची बाब माहे मार्च, २०२४ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान समोर आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी ७ जिल्ह्यातील गाव नकाशे तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे, तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) कोकण विभागातील ७ जिल्ह्यांपैकी मुंबई शहर जिल्ह्यास गाव नकाशा लागू होत नाही. मात्र, उर्वरित ६ जिल्ह्यांतील अधिकार क्षेत्रातील गाव नकाशे संबंधित उप अधीक्षक कार्यालयात उपलब्ध असून ते डिजीटाईज्ड स्वरूपात देखील संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत.
(३) महाराष्ट्र स्मॉल स्केल ट्रॅडिशनल फिश वर्कर संघटनेने दिनांक २३/०३/२०२४ रोजी विविध मागण्यासंदर्भातील निवेदन विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना सादर केले आहे. त्यांनी सदर निवेदन जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविले आहे.
(४) कोकण विभागातील शासनाने चौकशी करुन ७ जिल्ह्यांपैकी मुंबई शहर जिल्ह्यास गाव नकाशा लागू होत नाही. तथापि, मुंबई शहर जिल्ह्यातील ७ कोळीवाडे व कुलाबा मच्छिमार वसाहत यांची सिमांकन मोजणीची कार्यवाही करण्यात आली असून सदरचे नकाशे कायम करण्याची कार्यवाही सुरू आहे. मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये संबंधित भूमी अभिलेख कार्यालयात गाव नकाशे उपलब्ध असून सदर गाव नकाशे स्कॅनिंग व डिजीटाईज्ड स्वरूपात संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्याबाबत

**(३८)** * **२३८१० डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यात माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने रुपये १६७.८६ कोटी इतक्या रकमेची नुकसान भरपाई देण्याचे शासनाने जाहीर केल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने जाहीर केलेल्या उक्त रकमेपैकी प्रत्यक्षात केवळ रुपये ६.३३ कोटी रक्कम नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हिंगोली जिल्ह्यातील उर्वरित सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) होय.
(२) व (३) शासन निर्णय क्र. सीएलएस-२०२३ /प्र.क्र.२८६/म-३, दिनांक ३१/०१/२०२४ अन्वये मंजूर केलेल्या रुपये १६७८६.६५ लक्ष निधी पैकी रुपये ६२६२.०८ लक्ष निधी महाआयटीमार्फत विकसीत केलेल्या संगणकीय प्रणालीवर अपलोड करण्यात आलेला असून बाधित झालेल्या लाभार्थींना केंद्रीभूत

पध्दतीने थेट लाभार्थी हस्तांतरण प्रणालीमार्फत मदत वितरित करण्यात येत आहे. तसेच उर्वरीत पात्र लाभार्थ्यांची माहीती संगणकीय प्रणालीवर अपलोड करण्याची कार्यवाही तहसिल स्तरावर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील जेएसडब्ल्यू प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळणेबाबत

**(३९)** * **२३२६० श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साळाव, चेहेर, मिठेखार, वाघुळवाडी, नवीन चेहेर, निडी (ता.मुरुड, जि.रायगड) येथील जेएसडब्ल्यू (JINDAL SOUTH WEST) प्रकल्पामुळे सन १९८९ मध्ये २०० व सन २००९ मध्ये १२६ असे बाधित झालेले एकूण ३२६ प्रकल्पग्रस्त शेतकरी मागील ३० वर्षांपासून आपल्या मागण्यांसाठी शासनाकडे निवेदनाद्वारे पाठपुरावा करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७ ऑगस्ट, २०२३ रोजी बैठक घेऊन अतिरिक्त जिल्हाधिकारी यांची एक सदस्य समितीचे गठन करून एक महिन्याच्या आत सन १९८९ व २००९ मधील बाधित शेतकऱ्यांसंदर्भात मुद्यांसह अहवाल तयार करण्याचा आदेश दिला होता, परंतु आजपर्यंत अहवाल सादर केला गेला नसल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जेएसडब्ल्यू प्रकल्पग्रस्तांनी उपोषण सुरू केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जेएसडब्ल्यू प्रकल्पग्रस्त उपोषणकर्त्यांपैकी आठ उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावल्याने त्यांना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील जेएसडब्ल्यू प्रकल्पग्रस्तांना योग्य तो न्याय मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) हे खरे आहे.

साळाव, चेहेर, मिठेखार, वाघुळवाडी, नवीन चेहेर, निडी, ता.मुरूड या गावातील शेतकरी यांनी दिनांक ३१/०३/२०२३ रोजी जिल्हाधिकारी, यांच्या कार्यालयास निवेदन दिलेले आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

मा.पालकमंत्री, रायगड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी, रायगड कार्यालय येथे यासंदर्भात बैठक झाली. त्यामध्ये दिलेल्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी, रायगड यांची एक सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली. सदर समितीने तयार केलेल्या अहवालासंदर्भात दिनांक २४/०१/२०२४ रोजी मा.जिल्हाधिकारी रायगड यांचे अध्यक्षतेखाली कंपनीचे प्रतिनिधी, बाधित शेतकरी व संबंधित अधिकारी यांची बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीमध्ये एक सदस्यीय समितीच्या अहवालाचे मुद्देनिहाय वाचन करण्यात आले. समितीने केलेल्या शिफारशींबाबत शासनास अहवाल सादर करण्याचे व मुद्दा क्र.१ च्या अनुषंगाने सन १९८९-९० मधील खाजगी कंपनी बाधित प्रकल्पग्रस्त व सन २००९-१० मध्ये कंपनी प्रशासन व शेतकरी यांचेमध्ये झालेल्या करारा नुसार प्रकल्पग्रस्त/ शेतकरी यामधील नोकरी देण्यात आलेल्या व नोकरी देण्यास पात्र असलेल्या प्रकल्पग्रस्त/ शेतकऱ्यांची यादी निश्चित करणेकामी उपविभागीय अधिकारी, अलिबाग व तहसिलदार मुरुड यांचेकडून अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत पुन्हा बैठक घेण्यांत येवून जिल्हाधिकारी, रायगड यांचेस्तरावर पुढील निर्णय घेण्याबाबत येईल असा निर्णय घेण्यात आला. यासंदर्भात उपविभागीय अधिकारी, अलिबाग व तहसिलदार मुरुड यांचेकडून अंतिम अहवाल दिनांक ११/०३/२०२४ रोजी सादर केला आहे.

(३) हे खरे आहे.

उपोषणकर्ते व उपोषणकर्ते यांचे कायदेशीर प्रतिनिधी ॲड सिद्धार्थ इंगळे यांना दिनांक १२/०३/२०२४ रोजी प्रकल्पग्रस्त शेतकरी यांचे-मागण्यांच्या अनुषंगाने बैठकीस उपस्थित राहण्याबाबत व सुरू असलेले सामूहिक आमरण उपोषण मागे घेणेबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांच्या दिनांक ११/०३/२०२४ अन्वये विनंती केली होती. त्याअनुषंगाने उपोषणकर्त्यांनी उपोषण मागे घेतले होते.

(४) जिल्हाधिकारी, रायगड यांच्या कार्यालयाच्या दिनांक १५/०३/२०२४ अन्वये एकसदस्यीय समितीचा अहवाल मा.मंत्री उद्योग, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री रायगड जिल्हा यांचे कार्यालयास पुढील कार्यवाहीसाठी सादर केला आहे, असे उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), रायगड यांनी कळविले आहे.

तथापि, यासंदर्भात उद्योग विभागाकडे अभिप्राय मागितले असता, सदर अहवाल या कार्यासनास प्राप्त झाला नसल्याने याबाबत अभिप्राय देता येत नाही, असे उद्योग विभागाने (कार्यासन उद्योग- १४) या विभागास कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाल्याबाबत

**(४०) * २३२५६ श्री.आमश्या पाडवी, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय तथा अनुदानित आश्रम शाळेतील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या प्रमाणात मागील काही कालावधीत लक्षणीय वाढ झाली असून केदारगुडा (जि.नांदेड), कळमनुरी (जि.हिंगोली) तसेच वर्धा जिल्ह्यातील अशा अनेक अनुदानित आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांना विद्यार्थी आत्महत्येच्या प्रकरणात निलंबित केले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रवेशित विद्यार्थ्यांचे आश्रमशाळांमधील मनोधैर्य वाढावे तसेच आत्महत्यासारखे निर्णय घेण्याची त्यांची मानसिकता होऊ नये याकरीता मानसोपचार तज्ज्ञाची नेमणूक करण्याबाबत तसेच आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे अंशत: खरे आहे.

केदारगुडा, ता.हातगाव, जि.नांदेड येथील इयत्ता ४ थी च्या विद्यार्थीनीने माहे डिसेंबर, २०२२ मध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली या प्रकरणी मुख्याध्यापक यांना निलंबित केले असून त्यांच्या विरुध्द व स्त्री अधिक्षिकेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. या प्रकरणी या आश्रमशाळेतील १२ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या २ वेतनवाढी रोखण्यात आल्या आहेत.

वर्धा जिल्ह्यातील अनुदानित आश्रमशाळांमध्ये एप्रिल, २०२४ मध्ये आत्महत्येची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्याबाबत National Institute of Mental Health and Neuro Science, Bengluru, Karnataka (NIMHANS) यांच्या बरोबर शासनाने करार केला असून समुपदेशनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आत्महत्येपासून परावृत्त करण्याचे काम केले जाते. तसेच आश्रमशाळांमध्ये टी.व्ही. संचावर मनोधेर्य वाढवणारे व प्रेरणा देणारे चित्रपट /लघुपट दाखविण्यात येतात. मानसोपचार तज्ञांची व्याख्याने आयोजित केली जातात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची थकीत देयके अदा करण्याबाबत

**(४१) * २३५०२ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील काही साखर कारखान्यांचा अपवाद वगळता बहुतेक साखर कारखान्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे दोन ते तीन महिन्यांची देयके अदा केली नसल्याने ऊस उत्पादक शेतकरी अडचणीत आले असल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहमदनगर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची देयके वेळेत देण्यात येत नसल्याने मुला-मुलींचे शिक्षण, लग्न, दवाखाना व इतर घरगुती खर्च भागविताना शेतकरी कर्जबाजारी झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अहमदनगर जिल्ह्यासह राज्यभरातील साखर कारखान्यांकडून सर्वच ऊस उत्पादक शेतकऱ्यांची थकीत देयके अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) हंगाम २०२३-२०२४ मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील २२ साखर कारखान्यांनी दिनांक १५/०४/२०२४ अखेर एकूण रुपये १२७२८१७१.०३ मे. टन गाळप केले असून देय एफआरपी रुपये ३००८६८.४१ लाख पैकी रुपये २५५५९०.९२ लाख इतकी FRP शेतकऱ्यांना अदा केली आहे. एफआरपी थकीत असलेल्या साखर कारखान्यांना एफआरपी अदा करण्यासंदर्भात दिलेल्या सूचनांनूसार दिनांक १५/०५/२०२४ अखेर देय एफआरपी रुपये ३०९७६२.५६ लाख पैकी रुपये २९४७८२.३७ लाख इतकी FRP शेतकऱ्यांना अदा करण्यात आली आहे.

हंगाम २०२३-२०२४ मध्ये ज्या कारखान्यांनी ऊस पुरवठादार शेतकऱ्यांची एफआरपी थकीत केली आहे त्या कारखान्याची सुनावणी साखर आयुक्त स्तरावर चालू आहे.

अदा केलेल्या एफआरपीचे प्रमाण ९५.१६% आहे.

(२) खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.